भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

# हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक ७८)

[दिनांक ५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

# Hindu Adoption and Maintenance Act, 1956

(Act No. 78 of 1956)

[As in force on the 5th December 1991]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.

१९९३

[ किंमत : रुपये २.७५ ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक १, दिनांक ७ जानेवारी १९९२ यात पृष्ठ ६५ ते ७१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ७ जानेवारी १९९२.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Hindu Adoption and Maintenance Act, 1956 as on the 5th December 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 3, dated 7th January 1992 on pages 65 to 71.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 7th January 1992.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

# हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६

कलमांचा क्रम

कलमे

## प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. अधिनियम लागू करणे.
३. व्याख्या.
४. अधिनियमाचा अधिभावी परिणाम.

## प्रकरण २ रे

### दत्तविधान

५. दत्तविधान या प्रकरणाद्वारे विनियमित होणे.
६. विधिग्राह्य दत्तविधानाची आवश्यक अंगे.
७. हिंदू पुरुषाची दत्तक घेण्याची क्षमता.
८. हिंदू स्त्रीची दत्तक घेण्याची क्षमता.
९. दत्तक देण्यास क्षमता असलेली व्यक्ती.
१०. कोणत्या व्यक्तीस दत्तक घेता येतील.
११. विधिग्राह्य दत्तविधानाच्या अन्य शर्ती.
१२. दत्तविधानाचे परिणाम.
१३. दत्तकग्राही मातापित्याचा स्वतःच्या संपत्तीची विल्हेवाट करण्याचा अधिकार.
१४. विवक्षित प्रकरणी दत्तकग्राही मातेची निश्चिती.
१५. विधिग्राह्य दत्तविधान रद्द करावयाचे नाही.
१६. दत्तविधानासंबंधीचा नोंदणी केलेल्या दस्तऐवजाबद्दल गृहीतक.
१७. विवक्षित देवघेवीस मनाई

## प्रकरण ३ रे

### निर्वाह

१८. पत्नीचा निर्वाह
१९. विधवा सुनेचा निर्वाह.
२०. अपत्यांचा व वृद्ध मातापित्यांचा निर्वाह.
२१. "अवलंबित व्यक्ती" याची व्याख्या.
२२. अवलंबित व्यक्तींचा निर्वाह.
२३. पोटगीची रक्कम.
२४. पोटगीचा मागणीदार हिंदू असावा.
२५. परिस्थितीत बदल झाल्यावर पोटगीची रक्कम कमीअधिक करता येईल.
२६. ऋणांना अग्रक्रम असणे.
२७. पोटगी हा केव्हा प्रभार असावयाचा.
२८. संपत्तीच्या हस्तांतरणाचा पोटगीच्या अधिकारावर परिणाम.

## प्रकरण ४ थे

### निरसने व व्यावृत्ती

३०. व्यावृत्ती.

# हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६

## (१९५६ चा अधिनियम क्रमांक ७८)[1]

(२१ डिसेंबर १९५६)

(५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान)

हिंदूंमधील दत्तक व निर्वाह यांसंबंधीचा कायदा विशोधित व संहिताबद्ध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमाला 'हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६' असे म्हणावे. (२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे. *संक्षिप्त नाव व विस्तार.*

२. (१) हा अधिनियम पुढील व्यक्तींना लागू आहे :— *अधिनियम लागू करणे.*

(क) जी व्यक्ती, धर्माने, त्याचे कोणतेही रूप किंवा विकसन यानुसार हिंदू आहे अशी कोणतीही व्यक्ती—वीरशैव, लिंगायत अथवा ब्राह्मोसमाजाची, प्रार्थनासमाजाची किंवा आर्यसमाजाची अनुयायी यांसुद्धा,

(ख) जी व्यक्ती धर्माने बौद्ध, जैन किंवा शीख आहे अशी कोणतीही व्यक्ती, आणि

(ग) जी व्यक्ती धर्माने मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी किंवा ज्यू नाही अशी अन्य कोणतीही व्यक्ती—मात्र हा अधिनियम पारित झाला नसता तर यात परामर्श घेण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधी हिंदू कायद्याने अथवा त्या कायद्याचा भाग असलेल्या कोणत्याही रूढीने किंवा परिपाठाने ती नियंत्रित झाली नसती असे सिद्ध करण्यात आले तर गोष्ट अलाहिदा.

स्पष्टीकरण.—पुढील व्यक्ती धर्माने, प्रकरणपरत्वे हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहेत :—

(क) ज्याचे मातापिता हे दोघेही धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहेत असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य ;

(ख) ज्याच्या मातापित्यांपैकी एकजण धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहे आणि अशी माता वा पिता ज्या जनजातीतील, समाजातील, समूहातील किंवा कुलातील आहे किंवा होता त्याचा घटक म्हणून ज्याचे पालनपोषण करण्यात आले आहे असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य ; [2]* * *

[3][ (खख) ज्या अपत्याची माता व पिता या उभयतांनी त्याचा परित्याग केलेला आहे किंवा ज्याचे मातापिता ज्ञात नाहीत आणि दोन्ही बाबतीत, ज्याचे हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख म्हणून पालनपोषण करण्यात आले आहे असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य ; आणि]

(ग) जी व्यक्ती धर्मांतर किंवा पुनर्धर्मांतर करून हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख धर्मात आलेली आहे अशी कोणतीही व्यक्ती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट संविधानाचा अनुच्छेद ३६६ याचा खंड (२५) याच्या अर्थानुसार कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या घटकव्यक्तींना लागू असणार नाही—मात्र केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अन्यथा निदेशित केले तर गोष्ट अलाहिदा.[4]

(३) या अधिनियमाच्या कोणत्याही भागातील "हिंदू" या शब्दप्रयोगात जी व्यक्ती धर्माने हिंदू नसली तरी या कलमात अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या आधारे जिला हा अधिनियम लागू होतो अशी जी व्यक्ती असेल त्या व्यक्तीचा त्यात जणूकाही समावेश असावा अशा तऱ्हेन या शब्दप्रयोगाचा अर्थ लावला जाईल.

---

१. हा अधिनियम, १९६३ चा विनियम ६, कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे दादरा आणि नगरहवेलीला लागू करण्यात आला आहे.

२. १९६२ चा अधिनियम ४५, कलम २ द्वारे "आणि" हा शब्द गाळला.

३. वरील अधिनियमाच्या, कलम २ द्वारे घातले.

४. या अधिनियमाचे कलम २ पाँडिचेरीला लागू करताना, पोटकलम (२) नंतर पुढील मजकूर घालण्यात येईल :—

"(२क) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही बाब पाँडिचेरी या संघ राज्यक्षेत्राच्या रेनोंकान्सना लागू होईल." (१९६८ चा अधिनियम २६ पहा).

मुंच ४३१२—२ (१,०३४—११-९३)

व्याख्या.

३. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "रूढी" व "परिपाठ" या शब्दप्रयोगांद्वारे, जो नियम सातत्याने व एकाच रूपात दीर्घकाळ पाळला जात असून ज्याला हिंदूंमध्ये कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, जनजातीत, समाजात, समूहात किंवा कुलात कायद्याचे बळ प्राप्त झालेले आहे असा कोणताही नियम दर्शवला जातो :

परंतु, तो नियम निश्चित असावा आणि गैरवाजवी किंवा लोकधोरणाच्या विरुद्ध नसावा : आणि

परंतु आणखी असे की, फक्त कुलालाच लागू असलेल्या नियमाच्या बाबतीत, त्या कुलाने तो सोडून दिलेला नसावा;

(ख) "निर्वाह" यात पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(एक) सर्व बाबतीत, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि वैद्यकीय देखभाल व उपचार यांची तरतूद;

(दोन) अविवाहित कन्येच्या बाबतीत, तिच्या विवाहाचा व तदनुषंगिक वाजवी खर्चसुद्धा;

(ग) "अज्ञान व्यक्ती" याचा अर्थ, जिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत ती व्यक्ती असा आहे.

अधिनियमाचा अधिभावी परिणाम.

४. या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही,—

(क) हिंदू कायद्याचे कोणतेही वचन, नियम किंवा निर्वचन अथवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी त्या कायद्याचा भाग म्हणून अंमलात असलेली कोणतीही रूढी किंवा परिपाठ या अधिनियमात जिच्याकरिता उपबंध केलेला आहे अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात परिणामक असण्याचे बंद होईल;

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्यांपैकी कोणत्याही उपबंधाशी तो जेथवर विसंगत असेल तेथवर, हिंदूंना लागू असण्याचे बंद होईल.

## प्रकरण २ रे

### दत्तविधान

दत्तविधान या प्रकरणाद्वारे विनियमित होणे.

५. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, एखाद्या हिंदूने किंवा त्याच्याप्रत करावयाचे कोणतेही दत्तविधान ते या प्रकरणात अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार असल्याखेरीज करता येणार नाही, आणि उक्त उपबंधांचे व्यतिक्रमण करून केलेले कोणतेही दत्तविधान शून्य असेल.

(२) जे दत्तविधान शून्य असेल त्यामुळे, कोणतीही व्यक्ती दत्तविधानाव्यतिरिक्त एरव्ही दत्तक घराण्यात संपादन करू शकली नसती असे कोणतेही अधिकार त्याच्या किंवा तिच्या प्रीत्यर्थ निर्माण होणार नाहीत, तसेच कोणत्याही व्यक्तीचे तिच्या किंवा त्याच्या जनक घराण्यातील अधिकार नष्टही होणार नाहीत.

विधिग्राह्य दत्तविधानाची आवश्यक अंगे.

६. (एक) दत्तक घेणाऱ्या व्यक्तीला दत्तक घेण्याची क्षमता आणि अधिकारही आहे;

(दोन) दत्तक देणाऱ्या व्यक्तीला तसे करण्याची क्षमता आहे;

(तीन) दत्तक घेतल्या जाणाऱ्या व्यक्तीला दत्तक घेतले जाण्याची क्षमता आहे; आणि

(चार) या प्रकरणात उल्लेखिलेल्या अन्य शर्तींचे अनुपालन करून दत्तविधान केलेले आहे,

असे असल्याखेरीज कोणतेही दत्तविधान विधिग्राह्य असणार नाही.

हिंदू पुरुषाची दत्तक घेण्याची क्षमता.

७. जो अविकल मनाचा आहे व अज्ञान नाही अशा कोणत्याही हिंदू पुरुषाला पुत्र किंवा कन्या दत्तक घेण्याची क्षमता आहे :

परंतु, जर त्याला हयात पत्नी असेल तर, तिची संमती असल्याखेरीज त्याला दत्तक घेता येणार नाही—मात्र त्या पत्नीने प्रपंचाचा संपूर्णपणे व कायमचा त्याग केला असेल किंवा ती हिंदू राहिलेली नसेल किंवा सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने ती विकल मनाची असल्याचे घोषित केलेले असेल तर गोष्ट अलाहिदा.

*स्पष्टीकरण.*—जर एखाद्या व्यक्तीला दत्तविधानाच्या वेळी एकाहून अधिक हयात पत्नी असतील तर, सर्व पत्नींची संमती आवश्यक आहे—मात्र मागील परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही कारणामुळे त्यांच्यापैकी कोणत्याही एकीची संमती अनावश्यक असेल तर गोष्ट अलाहिदा.

**हिंदू स्त्रीची दत्तक घेण्याची क्षमता.**

८. (क) जी अविकल मनाची आहे,

(ख) जी अज्ञान नाही, आणि

(ग) जी विवाहित नाही, अथवा विवाहित असल्यास जिच्या विवाहाचा विच्छेद झालेला आहे किंवा जिचा पती मरण पावला आहे किंवा जिच्या पतीने प्रपंचाचा संपूर्णपणे व कायमचा त्याग केलेला आहे किंवा तो हिंदू राहिलेला नाही किंवा सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने तो विकल मनाचा असल्याचे घोषित केलेले आहे;

अशा कोणत्याही हिंदू स्त्रीला पुत्र किंवा कन्या दत्तक घेण्याची क्षमता आहे.

**दत्तक देण्यास क्षमता असलेल्या व्यक्ती.**

९. (१) अपत्याची माता किंवा पिता किंवा पालक हे खेरीजकरून, कोणत्याही व्यक्तीला ते अपत्य दत्तक देण्याची क्षमता असणार नाही.

(२) [1][पोटकलम (३) व पोटकलम (४)] च्या उपबंधांच्या अधीनतेने, पिता हयात असल्यास दत्तक देण्याचा अधिकार त्याला एकट्यालाच असेल, पण मातेच्या संमतीवाचून असा अधिकार वापरला जाणार नाही—मात्र मातेने प्रपंचाचा संपूर्णपणे व कायमचा त्याग केलेला असेल किंवा ती हिंदू राहिलेली नसेल किंवा सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने ती विकल मनाची असल्याचे घोषित केलेले असेल तर गोष्ट अलाहिदा.

(३) जर पिता मरण पावला असेल किंवा त्याने प्रपंचाचा संपूर्णपणे व कायमचा त्याग केला असेल किंवा तो हिंदू राहिलेला नसेल किंवा सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने तो विकल मनाचा असल्याचे घोषित केले असेल तर, माता अपत्याला दत्तक देऊ शकेल.

[2][(४) पिता व माता दोघेही मरण पावले असतील किंवा त्यांनी प्रपंचाचा संपूर्णपणे व कायमचा त्याग केला असेल किंवा त्यांनी अपत्याचा परित्याग केला असेल किंवा सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने ते विकल मनाची असल्याचे घोषित केले असेल किंवा अपत्याचे माता-पिता ज्ञात नसतील त्या बाबतीत, अपत्याचा पालक, तो स्वतः धरून कोणत्याही व्यक्तीप्रत, न्यायालयाच्या पूर्वपरवानगीने, अपत्य दत्तक देऊ शकेल].

[3] (५) पोटकलम (४) खाली पालकाला परवानगी देण्यापूर्वी, दत्तविधान अपत्याच्या हिताचे आहे याबाबत—या प्रयोजनार्थ अपत्याचे वय व समज लक्षात घेऊन अपत्याच्या इच्छा यथायोग्य विचारात घ्याव्या—आणि दत्तविधानाच्या प्रतिफलार्थ न्यायालय मंजूर करील ते खेरीजकरून कोणतीही रक्कम किंवा बक्षिशी परवानगीसाठी अर्ज करणाऱ्याने घेतलेली किंवा घेण्याचे कबूल केलेले नाही व कोणत्याही व्यक्तीने अर्जदाराला दिलेली किंवा देण्याचे कबूल केलेले नाही याबाबत न्यायालय खात्री करून घेईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ—

(एक) "पिता" व "माता" या शब्दप्रयोगांत दत्तकग्राही पिता व दत्तकग्राही माता यांचा समावेश नाही ;
* * *

[4][(एक-क) "पालक" याचा अर्थ, अपत्याच्या देहाची किंवा त्याचा देह व संपत्ती या दोन्हींची देखभाल जिच्याकडे आहे अशी व्यक्ती असा आहे आणि त्यात—

(क) अपत्याच्या पित्याच्या किंवा मातेच्या मृत्युपत्राद्वारे नियुक्त करण्यात आलेला पालक, व

(ख) न्यायालयाने नियुक्त केलेला किंवा घोषित केलेला पालक

यांचा समावेश आहे; आणि]

(दोन) "न्यायालय" याचा अर्थ, दत्तक घ्यावयाचे अपत्य ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या आत सामान्यतः राहते असे नगर दिवाणी न्यायालय किंवा जिल्हा न्यायालय असा आहे.

**कोणत्या व्यक्तीस दत्तक घेता येतील.**

१०. पुढील शर्ती पूर्ण झाल्याखेरीज कोणतीही व्यक्ती दत्तक घेतली जाण्यास क्षम असणार नाही :—

(एक) तो किंवा ती हिंदू आहे;

(दोन) तो किंवा ती आधीच दत्तक घेतली गेलेली नाही;

(तीन) त्याचा किंवा तिचा विवाह झालेला नाही—मात्र ज्या व्यक्ती विवाहित असतील त्यांना दत्तक जाण्यास जीअन्वये मुभा आहे अशी एखादी पक्षांना लागू असलेली रूढी किंवा परिपाठ असेल तर गोष्ट अलाहिदा;

(चार) तिच्या किंवा त्याच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत—मात्र ज्या व्यक्तींच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण झालेली असतील त्यांना दत्तक जाण्यास जीअन्वये मुभा आहे अशी एखादी पक्षांना लागू असलेली रूढी किंवा परिपाठ असेल तर गोष्ट अलाहिदा.

---

१. १९६२ चा अधिनियम ४५, कलम ३ द्वारे "पोटकलम (३)" या मजकुराऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे पोटकलम (४) या ऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "आणि" हा शब्द गाळला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे घातले.

विधिग्राह्य दत्तविधानाच्या अन्य शर्ती.

११. प्रत्येक दत्तविधानाच्या बाबतीत, पुढील शर्तींचे अनुपालन झाले पाहिजे :—

(एक) जर दत्तविधान हे पुत्राचे असेल तर, जो/जी दत्तक घेत आहे त्या दत्तकग्राही पित्याला किंवा मातेला दत्तविधानाच्या वेळी हयात असलेला असा हिंदू पुत्र, पुत्राचा पुत्र किंवा पुत्राच्या पुत्राचा पुत्र (—मग तो औरस रक्तसंबंधाचा असो वा दत्तकसंबंधाचा असो—) असता कामा नये;

(दोन) जर दत्तविधान हे कन्येचे असेल तर, जो/जी दत्तक घेत आहे त्या दत्तकग्राही पित्याला किंवा मातेला दत्तविधानाच्या वेळी हयात असलेली अशी हिंदू कन्या किंवा पुत्राची कन्या (—मग ती औरस रक्तसंबंधाची असो वा दत्तकसंबंधीची असो—) असता कामा नये;

(तीन) जर पुरुषाकडून दत्तविधान होत असेल आणि दत्तक घ्यावयाची व्यक्ती स्त्री असेल तर, दत्तकग्राही पिता दत्तक घ्यावयाच्या व्यक्तीहून निदान एकवीस वर्षांनी वडील असला पाहिजे;

(चार) जर स्त्रीकडून दत्तविधान होत असेल आणि दत्तक घ्यावयाची व्यक्ती पुरुष असेल तर, दत्तकग्राही माता दत्तक घ्यावयाच्या व्यक्तीहून निदान एकवीस वर्षांनी वडील असली पाहिजे;

(पाच) तेच अपत्य एकाच वेळी दोन किंवा अधिक व्यक्तींना दत्तक घेता येणार नाही ;

(सहा) दत्तक घ्यावयाचे अपत्य, अपत्याला त्याच्या जनक घराण्यातून [1][अथवा परित्यक्त अपत्याच्या बाबतीत किंवा ज्याचे मातापिता ज्ञात नाहीत त्या अपत्याच्या बाबतीत, जेथे त्याचे पालनपोषण करण्यात आले त्या ठिकाणाहून किंवा त्या घराण्यातून] त्याच्या दत्तक घराण्याकडे हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने संबंधित मातापित्यांनी किंवा पालकाने किंवा त्यांच्या प्राधिकारान्वये प्रत्यक्षतः दत्तक दिले पाहिजे व घेतले पाहिजे :

परंतु, दत्तविधानाच्या विधिग्राह्यतेसाठी दत्तहोम करण्याची आवश्यकता असणार नाही.

दत्तविधानाचे परिणाम.

१२. दत्तक अपत्य सर्व प्रयोजनांकरता दत्तविधानाच्या दिनांकी व तेव्हापासून त्याच्या किंवा तिच्या दत्तक पित्याचे किंवा मातेचे अपत्य असल्याचे मानले जाईल आणि अशा दिनांकापासून त्या अपत्याचे त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्याशी असलेले सर्वबंध तुटलेले आहेत व त्यांची जागा दत्तविधानामुळे दत्तक कुटुंबात निर्माण झालेल्या बंधांनी घेतली आहे असे मानले जाईल :

परंतु,—

(क) ते अपत्य जर त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्यात राहिले असते तर जिच्याशी विवाह करू शकले नसते अशा कोणत्याही व्यक्तीशी तो किंवा ती विवाह करू शकत नाही ;

(ख) दत्तक अपत्याच्या ठायी दत्तविधानापूर्वी निहित झाली होती अशी कोणतीही संपत्ती, अशा संपत्तीच्या मालकीशी संलग्न अशी कोणतीही आबंधने असल्यास—त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्यातील नातलगांचा निर्वाह चालवण्याचे आबंधन धरून—त्यांच्या अधीनतेने अशा व्यक्तीच्या ठायी निहित असण्याचे चालू राहील ;

(ग) दत्तक अपत्य कोणत्याही व्यक्तीकडे दत्तविधानापूर्वी त्याच्या किंवा तिच्या ठायी निहित झाली असेल अशी कोणतीही संपदा त्या व्यक्तीपासून निर्निहित करू शकणार नाही.

दत्तकग्राही मातापित्याचा स्वतःच्या संपत्तीची विल्हेवाट करण्याचा अधिकार.

१३. कोणत्याही विरुद्ध कराराच्या अधीनतेने, दत्तविधान हे दत्तकग्राही पित्याला किंवा मातेला, त्याच्या किंवा तिच्या संपत्तीची आंतरजीव हस्तांतरणाद्वारे किंवा मृत्युपत्राद्वारे विल्हेवाट करण्याच्या शक्तीपासून वंचित करत नाही.

विवक्षित प्रकरणी दत्तकग्राही मातेची निश्चिती.

१४. (१) जेव्हा, ज्याला हयात पत्नी आहे असा हिंदू पुरुष अपत्य दत्तक घेतो तेव्हा, ती पत्नी दत्तकग्राही माता असल्याचे मानले जाईल.

(२) जेव्हा एकापेक्षा अधिक पत्नींच्या संमतीने दत्तविधान करण्यात आले असेल तेव्हा, त्यांच्यापैकी विवाहतः ज्येष्ठ असेल ती पत्नी दत्तकग्राही माता असल्याचे आणि इतर जणी सावत्र माता असल्याचे मानले जाईल.

(३) जेव्हा एखादा विधुर किंवा अविवाहित पुरुष अपत्य दत्तक घेईल तेव्हा त्यानंतर जिच्याशी तो विवाह करील अशी कोणतीही पत्नी दत्तक अपत्याची सावत्र माता असल्याचे मानले जाईल.

(४) जेव्हा विधवा किंवा अविवाहित स्त्री अपत्य दत्तक घेते तेव्हा, त्यानंतर ज्याच्याशी ती विवाह करील असा कोणताही पती दत्तक अपत्याचा सावत्र पिता असल्याचे मानले जाईल.

विधिग्राह्य दत्तविधान रद्द करावयाचे नाही.

१५. जे विधिग्राह्य रीतीने करण्यात आले असेल असे कोणतेही दत्तविधान, दत्तकग्राही पित्याकडून किंवा मातेकडून अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून रद्द होऊ शकत नाही अथवा दत्तक अपत्यही त्याच्या किंवा तिच्या अशा प्रास्थितीचा त्याग करून त्याच्या किंवा तिच्या जनक घराण्यात जाऊ शकत नाही.

---

१. १९६२ चा अधिनियम ४५, कलम ४ द्वारे जादाखल.

१६. दत्तविधान लेखनिविष्ट करण्यासाठी म्हणून केलेला, अपत्यास दत्तक देणाऱ्या व्यक्तीने व दत्तक घेणाऱ्या व्यक्तीने स्वाक्षरित करून, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली नोंदणी केलेला कोणताही दस्तऐवज जेव्हा जेव्हा न्यायालयापुढे दाखल केला जाईल तेव्हा तेव्हा, न्यायालय ते दत्तविधान या अधिनियमाच्या उपबंधांचे अनुपालन करून करण्यात आले आहे असे, ते नाशाबीत झाले नाही तर व तोपर्यंत, गृहीत धरील. दत्तविधानासंबंधीच्या नोंदणी केलेल्या दस्तऐवजांबद्दल गृहीतक.

१७. (१) कोणत्याही व्यक्तीला एखाद्या व्यक्तीच्या दत्तविधानाच्या प्रतिफलादाखल कोणतीही रक्कम किंवा अन्य बक्षिशी घेता येणार नाही किंवा घेण्याचे कबूल करता येणार नाही, आणि जी कोणतीही रक्कम किंवा बक्षिशी घेणे या कलमाने मना केले आहे ती रक्कम किंवा बक्षिशी कोणतीही व्यक्ती अन्य कोणत्याही व्यक्तीला देऊ शकणार नाही किंवा देण्याचे कबूल करू शकणार नाही. विवक्षित देयघेवींस मनाई.

(२) जर एखाद्या व्यक्तीने पोटकलम (१) च्या उपबंधांचे व्यतिक्रमण केले तर, ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल अशा कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) या कलमाखालील कोणताही खटला राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय सुरू करता येणार नाही.

## प्रकरण ३ रे

### निर्वाह

१८. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, हिंदू पत्नी—मग तिचा विवाह या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी झालेला असो किंवा नंतर असो—तिच्या हयातीत तिच्या पतीकडून तिचा निर्वाह चालविला जाण्यास हक्कदार असेल. पत्नीचा निर्वाह.

(२) हिंदू पत्नी,—

(क) जर तिचा पती अभित्यागाबद्दल—म्हणजे वाजवी कारणाशिवाय आणि तिच्या संमतीशिवाय किंवा तिच्या इच्छेविरुद्ध तिचा परित्याग करण्याबद्दल किंवा तिची बुद्धिपुरस्सर उपेक्षा केल्याबद्दल दोषी असेल तर ;

(ख) तिने तिच्या पतीबरोबर राहणे घातक किंवा हानिकारक होईल अशी वाजवी धास्ती तिच्या मनात उत्पन्न होण्याइतके त्याने तिला क्रूरपणाने वागविलेले असेल तर ;

(ग) तो उग्र स्वरूपाच्या कुष्ठरोगाने पीडित असेल तर;

(घ) त्याला अन्य कोणतीही हयात पत्नी असेल तर ;

(ङ) जेथे त्याची पत्नी रहात आहे त्याच घरात त्याने रखेली ठेवली असेल किंवा तो अन्यत्र नित्यश: रखेलीसह रहात असेल तर;

(च) धर्मांतरामुळे तो हिंदू राहिलेला नसेल तर ;

(छ) तिने विभक्त राहणे ज्यामुळे समर्थनीय ठरेल असे अन्य कोणतेही कारण असेल तर;

ती आपला पोटगीचा मागणीहक्क न गमावता आपल्या पतीपासून विभक्त राहण्यास हक्कदार होईल.

(३) हिंदू पत्नी जर शीलवती नसेल किंवा धर्मांतरामुळे हिंदू राहिली नसेल तर ती विभक्त निवासास व तिच्या पतीकडून पोटगी मिळण्यास हक्कदार असणार नाही.

१९. (१) हिंदू पत्नी—मग तिचा विवाह ह्या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी झालेला असो वा नंतर असो—आपल्या पतीच्या मृत्युनंतर जर तिच्या स्वत:च्या कमाईतून किंवा अन्य संपत्तीतून स्वत:चा निर्वाह चालविण्यास असमर्थ असेल अथवा तिची स्वत:ची संपत्ती नसेल त्याबाबतीत,— विधवा सुनेचा निर्वाह.

(क) तिच्या पतीच्या किंवा पित्याच्या किंवा मातेच्या संपत्तीतून अथवा

(ख) तिला एखादा पुत्र किंवा कन्या असल्यास त्याच्याकडून किंवा तिच्याकडून अथवा त्याच्या किंवा तिच्या संपत्तीतून,

पोटगी मिळवण्यास असमर्थ असेल तर व तेवढ्या व्याप्तीपुरते आपल्या सासऱ्याकडून आपला निर्वाह चालविला जाण्यास ती हक्कदार होईल.

(२) पोटकलम (१) खालील कोणतेही आबंधन पार पाडावयाचे असता जिच्यामधून सुनेला कोणताही हिस्सा मिळालेला नाही अशा, स्वत:च्या कब्जातील कोणत्याही सहदायकी संपत्तीतून तसे करण्याचे साधन सासऱ्यापाशी नसेल तर, ते आबंधन बजावणीयोग्य असणार नाही, आणि सुनेच्या पुनर्विवाहानंतर असे कोणतेही आबंधन समाप्त होईल.

२०. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, हिंदू व्यक्ती त्याच्या किंवा तिच्या हयातीत त्याची किंवा तिची औरस किंवा अनौरस अपत्ये व त्याचे किंवा तिचे वृद्ध किंवा दुर्बल मातापिता यांचा निर्वाह चालविण्यास बांधलेली आहे. अपत्यांचा व वृद्ध मातापित्यांचा निर्वाह.

(२) औरस किंवा अनौरस अपत्याला, जोवर ते अपत्य अज्ञान आहे तोवर त्याच्या किंवा तिच्या पित्याकडून किंवा मातेकडून पोटगी मिळण्याचा दावा सांगता येईल.

(३) आपल्या वृद्ध किंवा दुर्बल मातेचा वा पित्याचा अथवा आपली जी कन्या अविवाहित असेल तिचा निर्वाह चालविण्याचे एखाद्या व्यक्तीवर जे आबंधन असेल ते, प्रकरणपरत्वे, ती माता वा तो पिता किंवा अविवाहित कन्या जोवर आपल्या स्वतःच्या कमाईतून किंवा अन्य संपत्तीतून आपला निर्वाह चालविण्यास असमर्थ असेल तोवर जारी असते.

**स्पष्टीकरण.**—या कलमात, "मातापिता" यात अपत्यहीन सावत्रमातेचा समावेश आहे.

**"अवलंबित व्यक्ती" याची व्याख्या.** २१. या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, "अवलंबित व्यक्ती" याचा अर्थ, मृताचे पुढील नातलग असा आहे :—

(एक) त्याचा किंवा तिचा पिता ;

(दोन) त्याची किंवा तिची माता ;

(तीन) त्याची विधवा—ती पुनर्विवाह करत नाही तोवर ;

(चार) त्याचा किंवा तिचा पुत्र अथवा त्याच्या पूर्वमृत पुत्राचा पुत्र अथवा त्याच्या पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राचा पुत्र—तो अज्ञान आहे तोवर; नातवाच्या बाबतीत तो त्याच्या पित्याच्या किंवा मातेच्या संपदेतून आणि पणतवाच्या बाबतीत तो त्याच्या पित्याच्या किंवा मातेच्या किंवा पित्याच्या पित्याच्या किंवा पित्याच्या मातेच्या संपदेतून पोटगी मिळवण्यास असमर्थ असेल तर व त्या व्याप्तीपुरते;

(पाच) त्याची किंवा तिची अविवाहित कन्या अथवा त्याच्या पूर्वमृत पुत्राची अविवाहित कन्या अथवा त्याच्या पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राची अविवाहित कन्या—ती अविवाहित राहील तोवर; नातीच्या बाबतीत ती तिच्या पित्याच्या किंवा मातेच्या संपदेतून आणि पणतीच्या बाबतीत ती तिच्या पित्याच्या किंवा मातेच्या किंवा पित्याच्या पित्याच्या किंवा पित्याच्या मातेच्या संपदेतून पोटगी मिळवण्यास असमर्थ असेल तर व त्या व्याप्तीपुरते;

(सहा) त्याची विधवा कन्या :

(क) आपल्या पतीच्या संपदेतून; किंवा

(ख) तिला एखादा पुत्र किंवा कन्या असल्यास त्याच्याकडून किंवा तिच्याकडून अथवा त्याच्या किंवा तिच्या संपदेतून; किंवा

(ग) आपल्या सासऱ्याकडून किंवा त्याच्या पित्याकडून किंवा त्यांपैकी कोणाच्याही संपदेतून,

पोटगी मिळवण्यास ती असमर्थ असेल तर व त्या व्याप्तीपुरते;

(सात) त्याच्या पुत्राची किंवा त्याच्या पूर्वमृत पुत्राच्या पुत्राची कोणतीही विधवा—ती पुनर्विवाह करीत नाही तोवर आपल्या पतीच्या संपदेतून अथवा तिला एखादा पुत्र किंवा कन्या असल्यास त्याच्याकडून किंवा तिच्याकडून अथवा त्याच्या किंवा तिच्या संपदेतून, अथवा नातवाच्या विधवेच्या बाबतीत तिच्या सासऱ्याच्या संपदेतूनही पोटगी मिळवण्यास ती असमर्थ असेल तर व त्या व्याप्तीपुरते;

(आठ) त्याचा किंवा तिचा अज्ञान अनौरस पुत्र—तो अज्ञान आहे तोवर ;

(नऊ) त्याची किंवा तिची अनौरस कन्या—ती अविवाहित आहे तोवर.

**अवलंबित व्यक्तींचा निर्वाह.** २२. (१) पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, मृत हिंदू व्यक्तीचे वारस, त्यांना मृताकडून वारसाने मिळालेल्या संपदेतून मृताच्या अवलंबित व्यक्तींचा निर्वाह चालवण्यास बांधलेले आहेत.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभी तर मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या संपदेत एखाद्या अवलंबित व्यक्तीला मृत्युपत्रीय किंवा अमृत्युपत्रीय उत्तराधिकाराने कोणताही हिस्सा मिळाला नसेल त्याबाबतीत ज्यांना ती संपदा मिळेल त्यांच्याकडून पोटगी मिळण्यास अवलंबित व्यक्ती, या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने हक्कदार असेल.

(३) संपदेतील हिस्सा मिळालेल्यांपैकी प्रत्येक व्यक्तीचे दायित्व संपदेतील त्याने किंवा तिने घेतलेल्या हिश्श्याच्या किंवा भागाच्या मूल्याच्या प्रमाणात असेल.

(४) पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जी स्वतः अवलंबित आहे अशा कोणत्याही व्यक्तीवर इतरांच्या निर्वाहापोटी अंशदान करण्याचे दायित्व येत असेल तेव्हा, या अधिनियमाखाली पोटगीच्या रूपाने तिला जे दिले जाऊ शकते त्याहून ज्याचे मूल्य कमी आहे किंवा अंशदान करण्याच्या दायित्वाची बजावणी करविल्यास ज्याचे मूल्य कमी होईल असा हिस्सा किंवा भाग तिला मिळाला असेल तर ती व्यक्ती याप्रमाणे अंशदान करण्यास दायी असणार नाही.

**पोटगीची रक्कम.** २३. (१) या अधिनियमाच्या उपबंधांखाली कोणतीही पोटगी देववायची की नाही व असल्यास किती हे निर्धारित करणे न्यायालयाच्या विवेकाधीन असेल, आणि तसे करताना न्यायालय, प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) किंवा पोटकलम (३), जेथवर लागू असेल तथवर, त्यामध्ये नमूद केलेल्या विचाराच्या बाबी यथायोग्य लक्षात घेईल.

(२) या अधिनियमाखाली पत्नीला, अपत्यांना अथवा वृद्ध किंवा दुर्बल मातापित्यांना कोणतीही पोटगीची रक्कम देववायची असल्यास, ती निर्धारित करताना, पुढील गोष्टी लक्षात घेतल्या जातील :—

(क) पक्षांचे स्थान व आस्थिती;

(ख) मागणीदाराच्या वाजवी गरजा;

(ग) मागणीदार विभक्त राहत असल्यास मागणीदाराने तसे करणे समर्थनीय आहे काय;

(घ) दावाकाराच्या संपत्तीचे मूल्य आणि अशा संपत्तीतून किंवा मागणीदाराच्या स्वत:च्या कमाईतून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने मिळालेले कोणतेही उत्पन्न;

(ङ) या अधिनियमाखाली पोटगीस हक्कदार असलेल्या व्यक्तींची संख्या.

(३) या अधिनियमाखाली अवलंबित व्यक्तीला कोणतीही पोटगीची रक्कम देववायची असल्यास ती निर्धारित करताना, पुढील गोष्टी लक्षात घेतल्या जातील :—

(क) मृताची ऋणे चुकती करण्यासाठी तरतूद केल्यानंतरचे त्याच्या संपदेचे निव्वळ मूल्य;

(ख) मृताच्या मृत्युपत्राखाली अवलंबित व्यक्तीसंबंधी कोणतीही तरतूद केलेली असल्यास ती;

(ग) दोघांमधील नातेसंबंधाची श्रेणी;

(घ) अवलंबित व्यक्तीच्या वाजवी गरजा;

(ङ) अवलंबित व्यक्ती व मृत व्यक्ती यांच्यातील पूर्वसंबंध;

(च) अवलंबित व्यक्तीच्या संपत्तीचे मूल्य आणि अशा संपत्तीतून अथवा त्याच्या किंवा तिच्या कमाईतून अथवा अन्य कोणत्याही मार्गाने मिळालेले कोणतेही उत्पन्न;

(छ) या अधिनियमाखाली पोटगीस हक्कदार असलेल्या अवलंबित व्यक्तींची संख्या.

**पोटगीचा मागणीदार हिंदू असावा.**

२४. कोणतीही व्यक्ती जर धर्मांतरामुळे हिंदू राहिली नसेल तर तो किंवा ती या प्रकरणाखाली पोटगीची हक्कमागणी करण्यास हक्कदार असणार नाही.

**परिस्थितील बदल झाल्यावर पोटगीची रक्कम कमीअधिक करता येईल.**

२५. जर पोटगीची रक्कम—मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर न्यायालयाच्या हुकूमनाम्याद्वारे निश्चित केलेली असो वा कराराद्वारे निश्चित केलेली असो—कमीअधिक करणे समर्थनीय ठरेल इतका महत्वाचा बदल परिस्थितीत घडून आला तर, ती मागाहून अशाप्रकारे कमीअधिक करता येईल.

**ऋणांना अग्रक्रम असणे.**

२६. कलम २७ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, मृताने काढलेल्या किंवा त्याच्या कडून प्रदेय असणाऱ्या सर्व प्रकारच्या ऋणांना या अधिनियमाखाली त्याच्या अवलंबित व्यक्तींच्या पोटगीच्या मागणीहक्कांपेक्षा अग्रक्रम असेल.

**पोटगी हा केव्हा प्रभार असावयाचा.**

२७. या अधिनियमाखालील अवलंबित व्यक्तीचा पोटगीचा मागणीहक्क हा मृताच्या संपदेवर किंवा तिच्या कोणत्याही अंशावर प्रभार असणार नाही, मात्र मृताच्या मृत्युपत्राद्वारे, न्यायालयाच्या हुकूमनाम्याद्वारे, अवलंबित व्यक्ती व संपदेचा किंवा तिच्या अंशाचा मालक यांच्यातील कराराद्वारे, किंवा अन्यथा त्याचा प्रभार निर्माण करण्यात आला असेल तर गोष्ट अलाहिदा.

**संपत्तीच्या हस्तांतरणाचा पोटगीच्या अधिकारावर परिणाम.**

२८. जेव्हा एखाद्या अवलंबित व्यक्तीला एखाद्या संपदेतून पोटगी मिळण्याचा अधिकार असेल आणि अशी संपदा किंवा तिचा कोणताही भाग हस्तांतरित करण्यात येईल तेव्हा, जर हस्तांतरितीला त्या अधिकाराची जाणीव असेल किंवा हस्तांतरण विनाप्रतिफल असेल तर, पोटगी मिळण्याचा अधिकार हस्तांतरितीविरुद्ध बजावता येईल; पण सप्रतिफल व त्या अधिकाराची जाणीव नसलेल्या अशा हस्तांतरिती-विरुद्ध मात्र नाही.

## प्रकरण ४ थे

### निरसने व व्यावृत्ती

२९. (निरसित.) 'निरसन व विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा ५८) कलम ३ व अनुसूची एक यांद्वारे निरसित.

**व्यावृत्ती.**

३०. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या कोणत्याही दत्तविधानावर परिणाम होणार नाही, आणि अशा कोणत्याही दत्तधानाची विधिग्राह्यता व त्याचा परिणाम जणू काही हा अधिनियम पारित झालाच नव्हता अशा प्रकारे निर्धारित केला जाईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई